नियमित फौजदारी खटला क्र.१४१/२०१८

सरकार वि.ईश्वर व इतर

निशाणी क्र.३६.

सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – नाना रामा भालेराव,

वय – ५२ वर्षे, धंदा –मजुरी

निवासस्थान – साकळी, ता. यावल, जि. जळगांव.

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे वि.स.स.अ.श्री.व्ही.एस.शेळके यांचेमार्फत –**

०१. दिनांक २१/०७/२०१८ रोजी मी पोलिसांसोबत घटनास्थळी गेलो नव्हतो. तेथे पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही. तसेच, माझ्यासमक्ष पोलिसांनीकाहीही जप्त केलेले नाही. आता दाखविलेले घटनास्थळ व सात जप्ती पंचनाम्यांवर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकूर मला माहिती नाही. मी आरोपींनाओळखत नाही.

**स.स.अ. यांच्या तोंडी विनंतीवरुन भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २१/०७/२०१८ रोजी पोलिसांनी मला घटनास्थळी बोलावून माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला होता, तसेच, जप्ती पंचनाम्यातील नमुद मुददेमाल माझ्यासमक्ष जप्त करून पंचनामे मला वाचून दाखवून त्यावर माझ्या सहया घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीं तर्फे विधिज्ञ श्री.ए.आर.सुरळकर, यांचेतर्फे.. नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/-

दि.१४/०२/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,यावल.